
27 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# वीर जवान तुझे सलाम


कोल्हापूर : कारगिल विजय दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर कारगिल युद्धात हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांना मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू टी. डी. शिर्के, डॉ. संदीप पाटील, एन.एस.एस.चे डी. के. गायकवाड यांच्यासह विद्यापीठातील शेकडो तरुण-तरुणींसह नागरिक उपस्थित होते.

(छाया : एस. अली)

27 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व अभिमानस फाऊंडेशनतर्फे कारगील युद्धातील शहिदांना कँडल मार्चद्वारे आदरांजली वाहण्यात आली.

# कँडल मार्चद्वारे शहीद जवानांना अभिवादन

## कारगिल विजय दिवस : अभिमानस फाउंडेशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ व अभिमानस फाउंडेशनतर्फे कारगिल युद्धातील शहिदांना कँडल मार्चद्वारे आज आदरांजली वाहण्यात आली. कारगिल शौर्यदिनाच्या स्मृतींना या वेळी उजाळा देण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या परिसरात हा कार्यक्रम झाला. या प्रसंगी उपस्थितांना कारगिल युद्धाविषयीचा माहितीपट दाखविण्यात आला. तसेच जवानांच्या प्रतिमा असलेले टॅटूचे वाटप करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, फाउंडेशनचे गौरव कोल्हापूरकर, डॉ. संदीप पाटील, शशिकांत भालकर, डॉ. जया पाटील, मानसी कोल्हापूरकर, जनसंपर्काधिकारी आलोक जत्राटकर उपस्थित होते.

27 JUL 2017


महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



अमित गद्रे



## कारगिल विजय दिन

महाराष्ट्र हायस्कूलमध्ये अभिमानस फाउंडेशनच्यावतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना देशभक्तीपर ट्यॅटूचे वितरण करण्यात आले. हातावरील ट्यॅटू दाखविताना विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठात काढण्यात आलेल्या कँडल मार्चमध्ये सहभागी विद्यार्थिनी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 JUL 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात कँडल मार्च




कोल्हापूर : कारगिल विजयादिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी सायंकाळी विद्यार्थ्यांनी कँडल मार्चेद्वारे शहिदांना अभिवादन केले. यावेळी कारगिल युद्धावर आधारीत जवानांच्या पराक्रमाचा माहितीपट दाखवण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. संदीप पाटील, डॉ. डी. के. गायकवाड, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017

लोकमत

# विद्यापीठात कँडल मार्च



कारगील विजय दिनानिमित्त बुधवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठात मुख्य इमारतीसमोर विद्यापीठातील विविध अधिविभागांतील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी कँडल मार्च काढून कारगील युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना अभिवादन केले.

27 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अधिसभेत बृहत आराखड्याला मान्यता; रोजगारक्षम अभ्यासक्रमांच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाचे पाऊल

# नवे ११९ अभ्यासक्रम; सॅटेलाईट सेंटरची सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोककला महाविद्यालय, प्रत्येक तालुका स्तरावर महिला महाविद्यालय, नवे ११९ अभ्यासक्रम आणि दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाईट सेंटर सुविधेचा समावेश असलेल्या पाच वर्षांच्या बृहत आराखड्यला शिवाजी विद्यापीठ अधिसभेने (सिनेट) बुधवारी मान्यता दिली. या बृहत आराखड्याच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांचे शिक्षण देण्याच्या दिशेने विद्यापीठाचे पाऊल पडले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आदी यांच्या उपस्थितीत झाली. त्यात प्रारंभी कुलगुरु डॉ. शिंदे यांनी विद्यापीठातील विविध विभागांची राबविलेल्या उपक्रमांची माहिती सभागृहाला दिली. त्यानंतर कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी मार्चमध्ये झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत मांडला. प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीसाठीचा विद्यापीठाचा शैक्षणिक बृहत आराखडा सभागृहासमोर सादर केला. त्यात त्यांनी संबंधित आराखडयासाठी राबविलेली प्रक्रिया, अभ्यासक्रम, विद्याशाखा, महाविद्यालये आदींची माहिती दिली. सभागृहाने या आराखड्याला मान्यता दिली.

## बृहत आराखड्याची थोडक्यात माहिती

- कला शाखेसाठी २४, वाणिज्यकरिता 30, विज्ञान शाखेसाठी ५५, तर इतर दहा नवे अभ्यासक्रम
- प्रत्येक तालुका पातळीवर महिला महाविद्यालय
- चंदगड, शाहूवाडी, चांदोली धरण परिसर, जत, माणगांव, खरोशी (महाबळेश्वर) येथे सॅटेलाईट सेंटर साकारण्याचा प्रस्ताव
- कौशल्य आधारित व कम्युनिटी महाविद्यालय
- ऊर्दू माध्यमातून विज्ञान शाखेचे शिक्षण
- शुगर टेक्नॉलॉजी, योग शिक्षण, खादी उत्पादन व नक्षीकामाबाबतचा अभ्यासक्रम
- बी. ए. क्रिएटिव्ह रायटिंग, ब्रेल, कार्बन ट्रेडिंग, डिझायनिंग ॲण्ड गेमिंग अभ्यासक्रम



## 'सॅटेलाईट सेंटर'ची संकल्पना

दुर्गम आणि आदिवासी भागांत एखादे महाविद्यालय सुरु करणे शक्य होत नाही. अशा स्थितीत या ठिकाणी सॅटेलाईट सेंटर सुरु करण्यात येईल. या सेंटरची जबाबदारी एखाद्या महाविद्यालयावर सोपविण्यात येईल. हे महाविद्यालय या सेंटरमध्ये त्यांच्या काही प्राध्यापकांच्या माध्यमातून संबंधित दुर्गम परिसरातील विद्यार्थ्यांना आवश्यक शिक्षण आणि मार्गदर्शन करतील. शिवाय त्या परिसरात काही संशोधनदेखील करतील. नवीन विद्यापीठ कायद्यातील तरतुदींनुसार संबंधित सेंटर उभारण्यात येणार आहेत.

## राज्यातील कुलसचिवांच्या बैठकीत प्रशंसा

- जूनमध्ये उच्च शिक्षण संचालकांनी राज्यातील विविध विद्यापीठांतील कुलसचिवांची 'बृहत् आराखडा'बाबत बैठक घेतली. यात शिवाजी विद्यापीठाने बृहत् आराखडा तयार करण्यासाठी राबविलेल्या प्रक्रियेची माहिती दिली.
- त्याची संचालकांनी प्रशंसा केली. शिवाय अन्य विद्यापीठांनी संबंधित प्रक्रियेचा विचार करण्यास सुचविल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

## स्पर्धात्मक युगात रोजगारक्षम विद्यार्थी घडविण्याचे आव्हान

- नव्या विद्यापीठ कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक बृहत आराखडा बनविण्यात आला आहे. याद्वारे स्पर्धात्मक युगात रोजगारक्षम विद्यार्थी घडविण्याचे आव्हान पेलण्याचा प्रयत्न विद्यापीठाने केला आहे, असे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भाग आणि कष्टकरी समाजातील आहेत. त्यांना आधुनिक युगाची ओळख करुन देणे. त्यांना कौशल्यपूर्ण, रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने बृहत आराखडा तयार केला आहे.
- शिक्षण, उद्योग-व्यवसाय आदी क्षेत्रांतील तज्ज्ञांसह समाजातील विविध घटकांची मते, सूचना जाणून घेतल्या आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उद्योग, व्यवसाय आणि सामाजिक गरजा, विद्यार्थी विकास लक्षात घेऊन अभ्यासक्रमांचा समावेश केला आहे. दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी सॅटेलाईट सेंटरचा प्रस्ताव समाविष्ट केला आहे. कोल्हापूरमध्ये लोककला महाविद्यालयदेखील आराखड्यात प्रस्तावित केले आहे.

27 JUL 2017

महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तालुकास्तरावर महिला महाविद्यालये

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

तालुकास्तरावर स्वतंत्र महिला महाविद्यालयाचा प्रस्ताव शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात मांडण्यात आला आहे. बुधवारी अधिसभेच्या सदस्यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली. हा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. त्यानंतरच स्वतंत्र महिला महाविद्यालयाचे स्वरूप स्पष्ट होणार आहे.

आगामी पाच वर्षांसाठी प्रस्तावित असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि मुलींच्या शिक्षणातील अडथळे यांचा विचार करून ग्रामीण भागात सॅटेलाइट सेंटर आणि स्वतंत्र महिला महाविद्यालय हे दोन प्रस्ताव महत्त्वपूर्ण ठरले आहेत. तसेच पश्चिम महाराष्ट्राला असलेला लोककलांचा वारसा पुढच्या पिढीकडून जपला जाताना त्याला शास्त्रशुद्ध शिक्षणाची जोड मिळावी यासाठी लोककला महाविद्यालये स्थापन करण्याचाही प्रस्ताव आराखड्यात आहे. उर्दू भाषेतून विज्ञानशाखेचा अभ्यासक्रम आणि नवे ११९ अभ्यासक्रमांचा समावेशही आराखड्यात असून शिक्षण अधिक रोजगारक्षम व्हावे यादृष्टीने अधिसभेत मंजूर करण्यात आलेला बृहत आराखडा भविष्यातील नव्या संधींशी सुसंगत करण्यात आला आहे.

>> संबंधित वृत्त...३



# तालुकास्तरावर शुगर इन्स्टिट्यूट

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



- ग्रामीण भागातील दुर्गम वसाहतीतील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाइट सेंटर
- विद्यापीठ कार्यक्षेत्रात तालुकानिहाय महिला, लोककला महाविद्यालय
- उर्दू भाषेतून विज्ञानशाखेच्या अभ्यासक्रमाची रचना
- कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधील ११९ नवे अभ्यासक्रम

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सादर करण्यात आलेला बृहत आराखडा बुधवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये (सिनेट) एकमताने मंजूर करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या अधिसभेची विशेष बैठक व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात झाली. यावेळी तालुका स्तरावर लोककला महाविद्यालय, महिला महाविद्यालय, शुगर इन्स्टिट्यूट, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाइट सेंटर आणि कला, विज्ञान व वाणिज्य शाखांमधील नवे ११९ अभ्यासक्रम या सुविधांचा समावेश असलेल्या पाच वर्षाच्या बृहत आराखड्याला अधिसभेत मंजुरी देण्यात आली. आराखडा पुढील कार्यवाहीसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्पष्ट केले. साखर कारखाना असलेल्या परिसरात तालुका स्तरावर शुगर इन्स्टिट्यूट स्थापन करण्याचाही प्रस्ताव या आराखड्यात आहे.

**शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत बृहत आराखड्याला मान्यता**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर इंडस्ट्रीची कौशल्याधिष्ठीत मागणी पूर्ण करण्याचे आव्हान आहे. वाढती स्पर्धा आणि कौशल्यपूर्ण शिक्षण हा मेळ जुळण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या हेतूने बृहत आराखड्यात समाविष्ट केलेल्या नव्या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगारक्षम होण्यासाठी फायदा होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भाग आणि कष्टकरी समाजातील आहेत. ग्रामीण भागातील दुर्गम वाड्यावस्त्यांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी खरोशी (महाबळेश्वर), चंदगड, जत, माणगाव येथे सॅटेलाईट सेंटरचा प्रस्ताव आराखड्यामध्ये मांडण्यात आला आहे.'

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उद्योग, व्यवसाय आणि सामाजिक गरजा, विद्यार्थी विकास लक्षात घेऊन अभ्यासक्रमांचा समावेश केला आहे. कोल्हापूरमध्ये स्वतंत्र लोककला महाविद्यालय असावे असे आराखड्यात प्रस्तावित केले आहे. तसेच उर्दू भाषेतून ज्यांना विज्ञानशाखेचे शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी विज्ञानशाखेचा उर्दू भाषेतील अभ्यासक्रम तयार करण्याबाबतही प्रस्ताव आराखड्यात सादर करण्यात आला आहे. विज्ञान शाखेसाठी ५५, कला शाखेसाठी २४, तर वाणिज्य शाखेसाठी ३० तर इतर शाखांमधील १० असे ११९ नवे अभ्यासक्रम सुरू करण्यासंदर्भात प्रस्ताव देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तालुकास्तरावर महिला महाविद्यालय, कौशल्याधिष्ठित कम्युनिटी महाविद्यालये स्थापन करण्याचा प्रस्ताव बृहत आराखड्यात अधोरेखित करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी उपक्रमांची माहिती अधिसभेसमोर सादर केली. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी मार्चमध्ये झालेल्या बैठकीतील वृतांत व विषयनिहाय झालेल्या चर्चेतील मुद्दे मांडले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीसाठीचा विद्यापीठाचा शैक्षणिक बृहत आराखडा सभागृहासमोर सादर केला. त्यात त्यांनी संबंधित आराखडा तयार करण्यासाठी राबविलेली प्रक्रिया, नवीन अभ्यासक्रम, विद्याशाखा, महाविद्यालये आदींची माहिती दिली. यानंतर झालेल्या चर्चेत अधिसभा सभागृहाने या आराखडा मंजूर असल्याचे जाहीर केले.

या बैठकीस प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. भारती पाटील, आदी उपस्थित होते.

27 JUL 2019

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्यवाढीचा ११९ अभ्यासक्रमांचा फॉर्म्युला

## अधिसभा : शैक्षणिक बृहत् आराखड्यास मंजुरी ; कम्युनिटी महाविद्यालयांसह सॅटेलाईट सेंटरचा समावेश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : कौशल्याधारित व कम्युनिटी महाविद्यालयांसह सॅटेलाईट सेंटरचा समावेश असलेला शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक बृहत् आराखडा अधिसभेत आज मंजूर करण्यात आला. कला शाखेसाठी चोवीस, वाणिज्य तीस व विज्ञान शाखेसाठी पंचावन्न, तर अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्रासाठी दहा अभ्यासक्रमांचा समावेश आराखड्यात केला असून, प्रत्येक तालुक्यात प्रत्येकी एक महिला महाविद्यालय व लोककला महाविद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उर्दू माध्यमातून विज्ञान शाखेचा अभ्यासक्रमही सुरू केला जाणार आहे. आराखड्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला जाणार असून, मंजुरी मिळाल्यानंतर महाविद्यालये व अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रस्ताव मागविणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभा झाली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्याची यंदा अंमलबजावणी झाली., या अंमलबजावणीनंतर विद्यापीठाची पहिली अधिसभा आज झाली. सुरवातीला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. त्यानंतर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बृहत् आराखड्याचे सादरीकरण केले. त्यांनी प्रत्येक तालुक्यात महिला महाविद्यालय, हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू करण्यासह कौशल्याधारित



रोजगारनिर्मिती करण्याच्या अनुषंगाने अभ्यासक्रमांचा आराखड्यात समावेश केल्याचे सांगितले. बी.ए., एम.ए.साठी क्रिएटिव्ह रायटिंग, एम. ए.साठी ॲनिमेशन, सिव्हिल स्टडी, बी.कॉम.साठी इन्शुरन्स, ऑनलाईन शॉपिंग, बी.एस्सी.साठी फूड प्रोसेसिंग अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश केला आहे. अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र शाखेसाठीसुद्धा अभ्यासक्रम आहेत. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सॅटेलाईट सेंटरद्वारे अवकाश संशोधनाची व्याप्ती कळावी, यासाठी सॅटेलाईट सेंटर स्थापन करण्याची तरतूदही आराखड्यात केली आहे. त्यानुसार महाबळेश्वर, जत, चंदगड, माण आदी ठिकाणी ती स्थापन केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. औषधनिर्मिती, सेरिकल्चर, कार्बन ट्रेडिंग, डिझाईन अँड गेमिंगसह ब्रेल लिपी अभ्यासक्रमसुद्धा सुरू केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिसभेनंतर पत्रकारांशी बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''बृहत् आराखडा हा शैक्षणिक दिशा दाखविणारा आहे. ग्रामीण, कष्टकरी भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी पोषक आहे. विद्यापीठाचा नवा कायदा जागतिक संदर्भात बदल घडवून आणणारा असल्याने, त्यादृष्टीने अभ्यासक्रमांचा समावेश आराखड्यात

पान २ वर »

### मुलींना उच्चशिक्षणाची संधी

कऱ्हाडच्या महिला महाविद्यालयात ११६० विद्यार्थिनी शिकत आहेत. उंबरा ओलांडून शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात मुलींचा ओढा आहे. ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण त्यांच्याच तालुक्यात उपलब्ध व्हावे, यासाठी प्रत्येक तालुक्यात महिला महाविद्यालय असणे आवश्यक आहे. त्यासाठीच आराखड्यात प्रत्येक तालुक्यात महिला महाविद्यालयाची तरतूद केली आहे.

### शुगर टेक्नॉलॉजीवर अभ्यासक्रम

कौशल्याधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय प्रत्येक तालुक्यात स्थापन करण्यासाठीची तरतूद आराखड्यात केली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचे प्रमाण लक्षात घेता, शुगर टेक्नॉलॉजीशी संबंधित अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. खादी प्रॉडक्शन अँड डिझाईन या अभ्यासक्रमाचासुद्धा आराखड्यात समावेश आहे.

### ट्रॅव्हल टुरिझम अभ्यासक्रम

पश्चिम महाराष्ट्राचा पर्यटनदृष्ट्या विचार केल्यास हा प्रदेश त्यासाठी उत्तम आहे. मात्र, त्या दृष्टीने अभ्यासक्रम असणे जरुरीचे होते. त्याचा विचार करून ट्रॅव्हल टुरिझम या अभ्यासक्रमाचा आराखड्यात समावेश केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
सकाळ

# कौशल्यवाढीचा ११९ अभ्यासक्रमांचा फॉर्म्युला

» पान १ वरून

केला आहे. स्पर्धेच्या मुख्य प्रवाहात विद्यार्थ्यांना उभे करण्याचा हेतू अभ्यासक्रमांचा समावेश करण्यामागे आहे. असे अभ्यासक्रम महानगरातील विद्यापीठांत आढळणार नाहीत.'' अधिसभेस परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अण्णासाहेब गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

2 7 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाईट कॉलेज

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बुधवारी शिवाजी विद्यापीठाची अधिसभेची विशेष बैठक विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात पार पडली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार बृहत आराखडा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मांडण्यात आला. यामध्ये दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सॅटेलाईट महाविद्यालयांद्वारे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच अनेक विद्यार्थीहिताचे निर्णय मंजूर करण्यात आले. अधिसभेने मंजूर केलेला हा आराखडा पुढील मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

अधिसभेच्या बैठकीनंतर या बृहत आराखड्याबद्दल माहिती देताना शिवाजी विद्यापीठाचे



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाची पुढील काळातील शैक्षणिक दिशा दाखविणारा हा आराखडा आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी हा ग्रामीण भागातील कष्टकरी समाजाचे प्रतिनिधित्व करणारा आहे. त्याला बाहेरच्या जगाशी ओळख करून देण्याचे काम शिवाजी विद्यापीठ करणार आहे. त्यासाठी मंजूर करण्यात आलेला हा बृहद आराखडा लाभकारक ठरणार आहे.

या आराखड्यानुसार रोजगारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात येणार आहे. कौशल्याधारित महाविद्यालय, कम्युनिटी महाविद्यालय आणि सॅटेलाईट महाविद्यालय या प्रमुख गोष्टींचा समावेश आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यात स्कील डेव्हलपमेंट, शुगर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, खादी उत्पादन आणि डिझाईन, पर्यटनाला असलेला वाव लक्षात घेऊन ट्रॅव्हल आणि टुरिझम अभ्यासक्रम सुरू करावा. उर्दू माध्यमातून विज्ञान शिकविण्यासाठी महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. बी. कॉम इन इन्शुरन्स, बी. ए. इन ब्रेल, बी. कॉम ई कॉमर्स, एम.एस्सी. इन कर्बन ट्रेडिंग, सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्यात येणार आहे.

## लोककला महाविद्यालयाची स्थापना

शिवाजी विद्याविद्यापीठाच्या अधिसभेत लोककला महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोल्हापूरला लोककलांचा मोठा वारसा आहे. या लोककला हळूहळू लुप्त होत आहे. या लोककला जतन करण्यासाठी लोककला महाविद्यालयाची संकल्पना मांडण्यात आली आहे. तसेच लोककला महाविद्यालय सुरू करण्यासाठी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येणार आहे.

27 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात सॅटेलाईट सेंटरसह कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम

## अधिसभेत एकमताने बृहत् आराखड्याचा ठराव मंजूरः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित महाविद्यालयांची होणार स्थापना

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीनुसार शैक्षणिक बृहत आराखडा बुधवारी झालेल्या अधिसभेत सादर करण्यात आला. या आराखड्या अंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. नवीन कायदा हा फक्त विद्यापीठाच्या दृष्टीने मार्गदर्शन करणारा नसून, जागतिकीकरणात शिक्षण क्षेत्रात बदल घडवून आणणारा आहे. तसेच रोजगार निहाय अभ्यासक्रमाचा विचार करून कम्युनिटी कॉलेज ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. त्यानुसार परिक्षेत्रामध्ये सॅटेलाईट सेंटर व महिला महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. हा आराखडा अधिसभेमध्ये एकमताने मंजूर केला असून पुढील मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.



देवानंद शिंदे होते.

विद्यापीठाचा बृहत आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशीनुसार मान्य करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका ठिकाणी इन्स्टिट्युट फॉर योगा एज्युकेशन, एक रात्र महाविद्यालय व एक लोककला महाविद्यालय, शासनाच्या धोरणारला अनुसरून प्रत्येक जिल्ह्यामध्ये सॅटेलाईट सेंटर सुरू करण्यात येणार आहे. या सेंटरच्या माध्यमातून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार आहे. जिल्ह्यातील एका महाविद्यालयात पी. जी. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, हॉटिल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, प्रत्येक तालुक्यात वास्तुशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचे महाविद्यालय, साखर कारखान्याजवळ इन्स्टिट्युट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी इन्स्टिट्युट, संलग्न महाविद्यालयात गरजेनुसार खादी प्रोडक्शन, डिझाईन अभ्यासक्रमाचा समावेश आहे. संलग्नीत महाविद्यालयात गरजेनुसार रिन्युएबल एनर्जी अभ्यासक्रम, पर्यटन विषयी अभ्यासक्रम, उर्दू माध्यमांमध्ये विज्ञान विद्याशाखा तसेच वाणिज्य विभागासाठी ३० कला व विज्ञान विभागासाठी ५५ अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

विद्यार्थी केंद्रीत बृहत आराखडा अधिसभेत एकमताने मंजूर करून विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्टीत शिक्षण देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा मूल्यमापन समितीचे संचालक महेश काकडे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नमिता खोत, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

### लोककला महाविद्यालयाची स्थापना

शैक्षणिक बृहत आराखड्यानुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक लोककला महाविद्यालय स्थापन करून, कोल्हापुरातील लोककलेचा वारसा पुढच्या पिढीला देण्याचा मानस आहे. ज्या पारंपारिक लोककला लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, त्या लोककला जतन करण्यासाठी लोककला महाविद्यालयाची संकल्पना मांडण्यात आली आहे. तसेच लोककला महाविद्यालयासह इतर अभ्यासक्रमासाठी ज्या शिक्षण संस्था प्रस्ताव पाठवतील त्या शिक्षण संस्थेची पाहणी करून, योग्य त्या अभ्यासक्रमाला मंजूरी देण्यात येणार आहे.

### उर्दू माध्यमामध्ये विज्ञान विद्याशाखा

उर्दू भाषिकांना विज्ञान विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाचे आपल्या भाषेत शिक्षण घेता यावे, यासाठी उर्दू माध्यमातून विज्ञान विद्याशाखा सुरू करण्यात येणार आहे. असा उर्दू भाषिकांना दिलासा देणारा ठरावही या अधिसभेत मंजूर करण्यात आला.

### इन्स्टिट्युट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी इन्स्टिट्युट

पश्चिम महाराष्ट्रात ऊस हे प्रमुख पिक आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याची तुलना करता पश्चिम महाराष्ट्रात सगळ्यात जास्त कारखाने आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक कारखान्याजवळ इन्स्टिट्युट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी इन्स्टिट्युट सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

### प्रत्येक जिल्ह्यामध्ये सॅटेलाईट सेंटर

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये सॅटेलाईट सेंटर सुरू करण्यात येणार आहे. प्रायोगीक तत्वावर चंदगड, शाहुवाडी, जत, चांदोली धरण परिक्षेत्र (सोनवडे), माण तालुका, महाबळेश्वर तालुक्यातील खरोशी या भागातील रिमोट एरियात प्रत्येकी एक सेंटर सुरू करण्यात येणार आहे.

2 7 JUL 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# सॅटेलाईट सेंटर, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम

## शिवाजी विद्यापीठ अधिसभेत बृहत आराखड्यास मंजुरी; जागतिक संदर्भ लक्षात घेऊन अभ्यासक्रमावर भर : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकसंख्येनुसार तालुकावार महिला कॉलेज, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सॅटेलाईट सेंटर आदींसह पारंपरिक अभ्यासक्रमाला रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची जोड देणारा २०१७-२०१८ ते २०२१-२२ या पाच वर्षांच्या कालावधीसाठीच्या शैक्षणिक बृहत आराखड्यास बुधवारी शिवाजी विद्यापीठ अधिसभेने मंजुरी दिली. जागतिक बदलाचे संदर्भ लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठीच्या अभ्यासक्रमावर बृहत आराखड्यात भर देण्यात आला असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अधिसभेनंतर बोलताना दिली.

अधिसभेत बृहत आराखड्याविषयी माहिती देताना प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्पष्ट केले की, शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखड्याचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून यापूर्वी कौतुक झाले आहे. भविष्याचा वेध घेऊन निर्माण केलेला हा आराखडा सर्वंकष विचार करून तयार करण्यात आला आहे. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी सविस्तर माहिती देत शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक आणि नावीण्यपूर्ण उपक्रमाचा आढावा घेतला. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी बृहत आराखडा वाचून दाखवला. अधिसभा सदस्यांनी आराखड्यात एकही दुरुस्ती सुचवली नसल्याचे त्यांनी सभेत निदर्शनास आणून दिले. अधिसभेसमोर आराखडा कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी सादर केला. यावेळी अधिसभेने एकमताने मंजुरी दिली. आता हा आराखडा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. व्ही. एन. शिंदे आदींसह सदस्य उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातून

> शिवाजी विद्यापीठाचे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. एकूण शैक्षणिक सुविधांचा विचार करता ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांना सुविधा कमी असतात. त्यामुळे या सर्वांचा विचार करून बृहत आराखडा हा विद्यार्थीकेंद्रित तयार करण्यात आला आहे. मुलींच्या शिक्षणाचा सविस्तर आढावा घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यात महिला कॉलेज तसेच दुर्गम अशा चंदगड, जत (सांगली), माण, महाबळेश्वर (सातारा), आदी ठिकाणी सॅटेलाईट सेंटरची संकल्पना निर्माण केली जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षकांना जाऊन शिकवण्याची चांगली पद्धत निर्माण होईल. नव्या अभ्यासक्रमांसह पारंपरिक अभ्यासक्रमात रोजगाराभिमुख आणि स्वयंरोजगार निर्माण करणारे अभ्यासक्रम प्रस्तावित करण्यात आले आहेत. कोल्हापूरच्या लोककला आणि कोल्हापूरसह सांगली व सातारा या परिसरातील पर्यटस्थळांचे महत्त्व लक्षात घेऊन अभ्यासक्रमांची जोड असणार आहे.
>
> **- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

**प्रस्तावित नवे अभ्यासक्रम**

बृहत आराखड्यात नव्या अभ्यासक्रमांसह पारंपरिक अभ्यासक्रमालाही नवी जोड देण्यात येणार आहे. यामध्ये बी.ए. एम.ए. अभ्यासक्रमासाठी क्रिएटिव्ह रायटिंग, ॲनिमेशन, योगा आदी ५५ अभ्यासक्रम तर बी.कॉम, एम.कॉम अभ्यासक्रमासाठी ई-कॉमर्स, ट्रेडिंग आदी ३० तसेच बी.एस्सी., एम.एस्सी.मध्ये फूड, फिशरीज आदींची जोड असणार आहे. तसेच प्रत्येक अभ्यासक्रमात सॉफ्ट स्किलचा समावेश असणार आहे. सर्वच शाखांमध्ये कौशल्याधारित अभ्यासक्रम निर्माण करण्यात येणार आहेत. साखर कारखाने, पर्यटन, हॉटेल मॅनेजमेंट अशा नव्या पद्धतीने रोजगार वाढणाऱ्या अभ्यासक्रमांचाही समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017

पुण्यनगरी

# ‘मुंबई’च्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी विद्यापीठाकडे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मुंबई विद्यापीठातील विविध परीक्षांचे निकाल अद्याप लागले नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, तसेच विद्यापीठाच्या या कारभाराविषयी विद्यार्थ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. परीक्षांचे निकाल लवकर लागावेत यासाठी राज्यपालांनी राज्यातील सर्व विद्यापीठांना उत्तरपत्रिका तपासण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रीन तपासणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

मुंबई विद्यापीठातील अनेक अभ्यासक्रमांचे निकाल अद्याप लागलेले नाहीत. हे निकाल लावण्यासाठी मुंबई विद्यापीठात युद्धपातळीवर काम केले जात आहे. तरीही मोठ्या प्रमाणात विविध अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासावयाच्या आहेत. या उत्तरपत्रिका वेळेवर तपासून पूर्ण होण्यासाठी मुंबई विद्यापीठास राज्यातील इतर विद्यापीठांनी मदत करावी, असे आदेश राज्यपाल के. विद्यासागर राव यांनी सर्व विद्यापीठांना दिले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ तपासणार मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका



कोल्हापूर, ता. २६ : मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे केले जाणार आहे. मुंबई विद्यापीठातील पेपर तपासणीपुढील पेच ध्यानात घेऊन शिवाजी विद्यापीठाने तेथील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत, मदतीचा हात पुढे केला आहे.

मुंबई विद्यापीठात विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकालाचा प्रश्न निर्माण झाला आहे. निकाल ३१ जुलैपर्यंत लागणे अपेक्षित असताना, त्याप्रमाणे कार्यवाही होईल अशी तेथील स्थिती दिसत नाही. शिवाजी विद्यापीठाचा परीक्षा विभाग निकाल जाहीर करण्यात अग्रेसर

पान ९ वर »

# शिवाजी विद्यापीठ तपासणार मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका

» पान १ वरून

आहे. मुंबई विद्यापीठातील निकालाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी शिवाजी विद्यापीठाकडे पेपर तपासणीसाठी विचारणा झाली होती. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत विद्यापीठाने त्याला तत्काळ होकार दिला आहे. कॉमर्स, मॅनेजमेंट, लॉ अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑनलाईन विद्यापीठाला मिळणार आहेत.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, ''विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत उत्तरपत्रिकांच्या तपासणीचे काम केले जाणार आहे.

त्यासाठी तीनशे प्राध्यापक उपलब्ध केले जाणार आहेत. एका प्राध्यापकाने दिवसाला तीस ते चाळीस उत्तरपत्रिका तपासल्या तर मुंबई विद्यापीठाचा निकाल वेळेत लावण्यात कोणतीच अडचण राहणार नाही.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# मुंबई विद्यापीठाला मदतीचा हात

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

मुंबई विद्यापीठाचा निकाल लांबल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी उत्तरपत्रिका तपासण्याच्या प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठातर्फे मुंबई विद्यापीठाला मदत करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेनंतर पत्रकारांना डॉ. शिंदे यांनी ही माहिती दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले की, मुंबई विद्यापीठांतर्गत विद्या शाखांचा निकाल ३१ जुलैअखेर जाहीर होणे अपेक्षित आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे कुलसचिव विभागातर्फे मुंबई विद्यापीठाच्या प्रलंबित निकालप्रक्रियेचा आढावा घेण्यात आला होता. यामध्ये मुंबई विद्यापीठातील ज्या विद्याशाखांचे निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत, त्या विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी मदत करण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाने दर्शवली आहे. सध्या राज्यातील अन्य विद्यापीठांतर्फे मुंबई विद्यापीठाला उत्तरपत्रिका तपासण्यासाठी मदत केली आहे.'

डॉ. शिंदे म्हणाले, 'मुंबई विद्यापीठाशी संपर्क साधून, ज्या विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करायचे आहे त्या विषयाशी संबधित अधिव्याख्यातांकडे उत्तरपत्रिका पाठवायच्या की अधिव्याख्यात्यांना मुंबई विद्यापीठाकडे पाठवायचे याबाबत सध्या चर्चा सुरू आहे. उत्तरपत्रिका ऑनलाइन तपासण्याचाही पर्याय विचाराधीन आहे.'

**शिवाजी विद्यापीठाचे निकाल अंतिम टप्प्यात**

विद्यापीठातर्फे यंदा ६२० विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी आजअखेर ५७२ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत. ४८ विषयांचे निकाल प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे असे कुलगुरू म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ धावले मुंबई विद्यापीठाच्या मदतीला

## पेपर तपासण्यासाठी सहकार्य केले जाणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठांतर्गत झालेल्या परीक्षांच्या पेपर तपासणीच्या सुरू असलेल्या गोंधळाची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. हा गोंधळ सावरण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी राज्यपालांनीच स्वत: लक्ष घातले आहे. त्यामुळे वेळेत पेपर तपासणीसाठी आणि निकाल लावण्यासाठी विविध विद्यापीठांना सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाचाही यामध्ये समावेश आहे. आता शिवाजी विद्यापीठ मुंबई विद्यापीठास यासाठी सहकार्य करणार आहे.

मुंबई विद्यापीठातील परीक्षांचे निकाल ३१ जुलैपर्यंत लावा अशा सूचना राज्यपालांनी दिल्या आहेत. मुंबई विद्यापीठाचे ऑनलाईन पेपर तपासले जात आहेत. दरवर्षी सरासरी अठरा लाख उत्तरपत्रिका विद्यापीठाच्या तपासल्या जातात. ३१ जुलैपर्यंत जर उत्तरपत्रिका तपासायच्या असतील तर दिवसाला ६० हजार उत्तरपत्रिका तपासायला हव्यात, असा सूर तज्ज्ञांनी यापूर्वी व्यक्त केला आहे. पेपर तपासणीसाठी इतर विद्यापीठांनी सहकार्य करावे, अशा सूचना राज्यपालांनी दिल्या आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाकडूनही यासाठी सहकार्य केले जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाकडून कॉमर्स, मॅनेजमेंट, लॉ या तीन विषयांचे पेपर ऑनलाईन तपासण्याच्या तयारीचे नियोजन सुरू असल्याचे समजते. शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या या सत्र परीक्षांपैकी बहुतेक परीक्षांचे निकाल लागले आहेत. त्यामुळे परीक्षा विभागाला मुंबई विद्यापीठाला सहकार्य करणे सोयीचे होणार आहे. याबाबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना विचारले असता त्यांनी दुजोरा दिला.

2 7 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कुलगुरूंची माहिती : उत्तरपत्रिका तपासणीसाठी करणार सहाय्य

# शिवाजी विद्यापीठाचा 'मुंबई'ला मदतीचा हात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** निकाल लावण्याबाबतचे आव्हान पेलण्यासाठी मुंबई विद्यापीठाला शिवाजी विद्यापीठ मदतीचा हात देणार आहे. काही विषयांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सहाय्य करण्याची विद्यापीठाची तयारी आहे, असे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी येथे सांगितले.

विद्यापीठाच्या अधिसभेनंतर कुलगुरु डॉ. शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मुंबई विद्यापीठाला उत्तरपत्रिका तपासणीबाबत केल्या जाणाऱ्या मदतीबाबत सांगितले की, दि. ३१ जुलैपर्यंत निकाल लावण्याचे आव्हान मुंबई विद्यापीठासमोर आहे. ते वेळेत पूर्ण करण्यासह विद्यार्थी हित लक्षात घेऊन कुलपतींच्या सूचनेनुसार राज्यातील काही अन्य विद्यापीठांनी मुंबई विद्यापीठाला मदत करण्याची तयारी दर्शविली आहे. त्याअंतर्गत उत्तरपत्रिका तपासणीबाबत सहकार्य करण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाने दर्शविली आहे.

कोणत्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी कमीत कमी वेळेत करून देता येईल, याबाबत परीक्षा विभाग व मूल्यमापन मंडळाचे संचालकांशी चर्चा करुन याबाबतची पुढील दिशा ठरविण्यात येईल. दरम्यान, शिवाजी विद्यापीठातील दुसऱ्या सत्रातील ६२० परीक्षांपैकी ५७२ परीक्षांचे निकाल बुधवारअखेर विद्यापीठाने जाहीर केले आहेत. २८ परीक्षांचे निकाल तयार आहेत. विद्यापीठाचे परीक्षा आणि निकालाबाबतचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे विद्यापीठाला 'मुंबई'ला मदतीचा हात देणे शक्य आहे.

### परीक्षा विभागाची तयारी

मुंबई विद्यापीठाला उत्तरपत्रिका तपासणीच्या कामात मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाची तयारी सुरु झाली आहे. कमी वेळेत अधिक चांगली मदत कशी करता येईल, यादृष्टीने परीक्षा विभाग अंदाज घेत आहे. कॉमर्स, मॅनेजमेंट आणि लॉ (विधि) अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑनलाईन पद्धतीने पात्र प्राध्यापकांकडून तपासणी करून घेण्याचा विचार होण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017

लोकमत

# विश्वनाथ शिंदे यांचा सोमवारी गौरव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील माजी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सोमवारी (दि. ३१) दुपारी तीन वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनात गौरव समारंभ आयोजित केला आहे. या कार्यक्रमात नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांचा सत्कार करण्यात येईल. हरिश्चंद्र थोरात यांच्या हस्ते 'लोकसाहित्य : जीवन आणि संस्कृती' या गौरव ग्रंथाचे, तर डॉ. शिंदेलिखित 'साहित्य : आकलन आणि आस्वाद' या ग्रंथाचे प्रकाशन रंगनाथ पठारे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. विश्वनाथ शिंदे गौरव समारंभ समितीने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
सकाळ

# डॉ. विश्वनाथ शिंदे यांचा सोमवारी गौरव

कोल्हापूर, ता. २६ : लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्या निवृत्तीनिमित्त सोमवारी (ता. ३१) गौरव समारंभ होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनामध्ये दुपारी तीन वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. या वेळी डॉ. शिंदेलिखित 'आकलन आणि आस्वाद' ग्रंथाचे प्रकाशन रंगनाथ पठारे यांच्या हस्ते होणार असून, माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांचा गौरव होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
सकाळ

# प्रवेश परीक्षा १६ ऑगस्टला

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे १६ ऑगस्टला प्रवेश परीक्षा होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली योजनेअंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी- नॉन क्रिमिलेअर व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन) समुदायातील पदवी प्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राअंतर्गत प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज केंद्रामध्ये उपलब्ध आहेत. आवश्यक कागदपत्रासह दुपारी २ ते ६ या वेळेत अर्ज ५ ऑगस्टपूर्वी सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे जमा करावेत. त्याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
तरुण भारत



# सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १६ ऑगस्टला प्रवेशपूर्व परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) नवी दिल्ली योजनेअंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी-नॉन क्रिमीलेअर व अल्पसंख्याक (मुस्लिम,ख्रिश्चन,शीख, बौध्द,जैन) विद्यार्थ्यांसाठी सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रात २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी ५ ऑगस्टपूर्वी सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रात दुपारी २ ते ६ या वेळेत प्रवेश अर्ज जमा करावा. या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा १६ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. यांची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017
सकाळ

# प्रा. प्रदीप भास्कर यांना पीएच. डी.

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रा. प्रदीप चंद्रकांत भास्कर यांना अभियांत्रिकीतील इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील पीएच.डी. प्रदान केली. प्रा. भास्कर यांनी बायोमेडिकल इंजिनिरिंग ॲप्लिकेशनअंतर्गत 'स्टडीज ऑन एफ.पी.जी.ए. बेस्ड डिजिटल फिल्टर्स फॉर नॉईस रिमोवाल इन इलेक्ट्रोकार्डिओग्रॅम' विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांनी इलेक्ट्रॉनिक्समधील नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांच्या शोधनिबंधावर आधारित प्रकाशने केली आहेत. भास्कर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इंस्टुमेंट्स इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. डी. उपलाने यांचे मार्गदर्शन, तर तंत्रज्ञान अधिविभागाचे माजी संचालक प्रा. डॉ. गिरीश कुलकर्णी, संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. आर. मुधोळकर यांचे सहकार्य मिळाले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 JUL 2017
सकाळ

# लोकमान्य टिळकांना आदरांजली

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातर्फे लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. या प्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, विद्यार्थी कल्याण संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, इतिहास विभागप्रमुख डॉ. एन. डी. पारेकर, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

27 JUL 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'हॉफ'च्या प्रशिक्षणात डीकेटीईच्या विद्यार्थ्यांचा सहभाग



**जर्मनी : हॉफ युनिव्हर्सिटी येथे प्रशिक्षण घेत असलेल्या डीकेटीईच्या विद्यार्थ्यांसमवेत हॉफ युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. स्क्रॉट उल्फगँग.**

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**
हॉफ युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस, जर्मनी या विद्यापीठामध्ये नॅक ए प्लस नामांकित अ‍ॅटोनॉमस डीकेटीईच्या टेक्स्टाईलचे १२ विद्यार्थी एक महिना कालावधीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण घेत आहेत. हॉफ युनिव्हर्सिटीने देशातील विविध इन्स्टिट्यूटला भेटी देऊन इच्छुक विद्यार्थ्यांची विविध चाचणीद्वारे बौद्धिक पातळी व संशोधनवृत्ती तपासली व जगभरातून एकूण ३० विद्यार्थ्यांची जर्मनी येथे प्रशिक्षणासाठी निवड केली. या निवड केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थी हे डीकेटीईचे आहेत. सलग तीन वर्षे डीकेटीईचे विद्यार्थी जर्मनी येथे प्रशिक्षण घेत आहेत.

या विद्यार्थ्यांना टेक्निकल टेक्स्टाईल्स, इनोव्हेटिव्ह टेक्स्टाईल्स, फिनिशिंग, सस्टेनेबल टेक्स्टाईल्स बिझनेस या विषयावर प्रशिक्षण कालावधीमध्ये अभ्यास करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये टेक्निकल टेक्स्टाईल टेस्ट करणाऱ्या सर्व सामग्री व त्यांच्या विविध पद्धती याचेदेखील ज्ञान अवगत होत आहे. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थी जगभरातील विविध रिसर्च तज्ज्ञांशी विचारविनिमय करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या संशोधनवृत्तीला चालना मिळत आहे. प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यार्थी जर्मनी येथील रिसर्च इन्स्टिट्यूट व इंडस्ट्रीजना भेट देत आहेत. एकंदरीतच हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी उपयुक्त ठरले आहे.

डीकेटीईचा हॉफ युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस, जर्मनी यांच्याशी विद्यार्थी कल्याणासाठी करार झाला आहे. याअंतर्गतच डीकेटीईचे १२ टेक्स्टाईलचे विद्यार्थी हॉफ युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस, जर्मनी येथे प्रशिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण निवडीसाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हॉफ युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. स्क्रॉट उल्फगँग यांनी डीकेटीईस भेट दिली आणि वैयक्तिक मुलाखतीद्वारे प्रणिल वोरा, अमित बोतरा, कुमार प्रतीक, सम्मेद मगदूम, यश निरंकारी, सोहम भंडारी, तेजस दुलाणी, राज प्रणेश, करण होगाडे, प्रीतम सुर्वे, शुभम पाटील, सोमेश तिवारी या विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली.

या विद्यार्थ्यांना डीकेटीई इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, उपसंचालक प्रा. डॉ. यू. जे. पाटील, प्रा. डॉ.एम. वाय. गुडियावर यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. यामध्ये ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. एस. बी. अकीवाटे यांचा मोठा वाटा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2017

Times of India

# Resident proof must be submitted by July 29

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The students who have enrolled for the graduate election will have to submit their resident proof on or before July 29.

The candidates will have to submit the online application along with a hard copy to the administration block. The student must be present in person to submit their application at SUK campus, read an SUK circular.

The last date for the submission of the resident proof was July 24, however, many student organisations have requested the authorities to extend the date, the circular added.

Regarding the extension in date, SUK registrar Vilas Nandavadekar said, "Information plays a vital role in the senate elections and hence the students must sent it immediately. The information sending has already been extended in the last few weeks."

## SUK ELECTION

The graduate constituency election in SUK senate election could prove to be a game changer for leading political parties this election season. The senate elections was last hel d in August 2015. With this, the elected representatives will again have to be a part of the administrative and academic bodies of the university.

A student body representative said, "More and more students should participate in this activity and submit the required information with the scheduled deadline."